# बेरार टाईम्स

हार्दिक शुभेच्छा

बेरार टाईम्स
वाचकांच्या विश्वासाची
१० वर्ष
दशकपूर्ती सोहळा

मुख्य संपादक- खेमेंद्र कटरे

बुधवार, २६ जानेवारी २०२२


## साप्ताहिक ई-पोर्टल-एक यशस्वी वाटचाल

माध्यम जगतात काम करीत असताना वर्तमानपत्राच्या माध्यमातून वाचकांशी संवाद साधण्याची संधी लाभली. अनेक वर्तमान पत्रात केलेल्या कामाचा अनुभव होता. परंतु, कार्पोरेट जगतातील माध्यमातून काम करीत असताना अनेक अडचणी येत होत्या. लोकशिक्षणाची व्याख्या त्या त्या माध्यम मालकानुसार बदलत होत्या. अशा वातावरणात बराच कालावधी घालवला. पण यातून मनाला समाधान लाभत नव्हते. लिखाणावर अनेकदा कात्री लावली जात असे. आपल्या समाजापासून अनेक बाबी ही कार्पोरेटमाध्यमे लपवीत असल्याची जाणीव झाली.अशा वातावरणात वावरत असताना मनात एक विचार चमकला. आणि त्यातून एक विचार प्रसवला, तो म्हणजे स्वतःचे नियत्रंण असलेले एखादे वृत्तपत्र आपण का सुरू करु नये.डोक्यात विचारचक्रे फिरू लागली. अखेर पूर्व विदर्भाच्या टोकावर असलेल्या गोंदिया शहराच्या मातीत बेरारटाईम्स या नावाने साप्ताहिकाचा जन्म झाला. तो सोन्याचा दिवस म्हणजे १४ डिसेंबर २०११.

वर्तमानपत्र म्हटले की अनेक अग्निदिव्यातून जावे लागते. वृत्तसंकलनापासून तर तो वृत्तपत्र वाचकांच्या हाती देण्यापर्यंतच्या सार्या उपाययोजना कराव्या लागतात.या सर्व कसोट्यांवर बेरारटाईम्सचे व्यवस्थापन खरे उतरले. आज विदर्भाच्या मातीत साप्ताहिक व पोर्टल बेरारटाईम्स अव्वल स्थानी असल्याचा सार्थ अभिमान वाटतो. साहेब नमस्कार, तुमच्या साप्ताहिकातून ही बातमी आधी कळली माझे समाधान झाले. अशा भ्रमणध्वनी संदेश वाचकाकडून कानावर पडतो तर त्याचे आनंद काही औरच असते.

अर्थातच या साप्ताहिकाच्या वाटचालीत वाचक, जाहिरातदार, बातमीदार, विक्रेते आणि हितचितकांचा मोठ्या प्रमाणात हातभार लागला आहे. या सर्व स्नेहीजनांच्या मदतीशिवाय साप्ताहिक बेरारटाईम्सची वाटचाल यशस्वी होणे शक्य नव्हते. म्हणून सर्वप्रथम या सर्वांचे मनापासून आभार.

प्रसार माध्यमाचा झपाट्याने विकास होत असताना डिजीटलायझेशनच्या युगात ई-पेपरची संकल्पना रूजू लागली. युवा वर्गात तर ई-पेपरचा मोठा चहेता वर्ग निर्माण झाला. या गटातील आणि मोबाईल क्रांतीमुळे ई-पेपरच्या दिशेने गेलेल्या वाचकांपर्यंत कसे पोचता येईल,याचा सुद्धा विचार बेरारटाईम्सच्या व्यवस्थापक मंडळाने केला. आणि अखेर २०१४ मध्ये बेरारटाईम्सचे ई-पोर्टल सुरू करण्यात आले. हळूहळू का होईना ई-माध्यम' जगतात सुद्धा आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने आमच्या पोर्टलने अल्पावधीतच गरुड झेप घेतली. आज मितीला २ कोटीवर ई-पोर्टलची वाचक संख्या आहे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब म्हणता येईल.या वाटचालीत पुढे ब्लॉगची सुद्धा सोय वाचकांसाठी करम्यात आली आहे. साप्ताहिक, ई-पोर्टल आणि ब्लॉग माध्यमाव्दारे आज पूर्व विदर्भासह, प्रांतिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वाचक सुद्धा या वृत्तपत्राला मिळाले आहेत. आणि वाचकांचा आकडा हा दिवसेंदिवस वाढत आहे.

गोंदिया सारख्या मागास समजल्या जाणार्या जिल्ह्यातून बेरारटाईम्स या साप्ताहिकाने घेतलेली गरूड झेप ही नक्कीच लक्षणीय ठरली आहे. आम्ही वाचकांच्या पसंतीला उतरण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो.माध्यमे आपल्या वतीने आलेल्या सुचना आणि मार्गदर्शन हे नेहमीच अपेक्षेप्रमाणे लाभत असते. यामध्ये राजकीय, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रासह इतर क्षेत्रातील व्यक्तींचे विशेष सहकार्य लाभत आले आहे. बेरारटाईम्सच्या या दशकपुर्ती वाटचालीत आपले सर्वांचे योगदान हे अविस्मरणीय असेच म्हणावे लागेल. आपल्या सहकार्बयाद्दल आपले पुनश्चः आभार. आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच मिळत राहो, ही नम्र विनंती...






संपादन
खेमेंद्र कटरे

संपादन साहाय्य
सुरेश भदाडे

संपादन साहाय्य
सुरेश भदाडे, एड.पृथ्वीराज कोल्हटकर

जाहीरात समन्वय
तुलसीदास भुजाडे आमगाव, सुभाष सोनवणे चिचगड

मांडणी सजावट
लवकुश डिझाईनर,हितेशकुमार

मराठी साप्ताहिक बेरार टाईम्सचे स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादन खेमेंद्र हिरदीलाल कटरे यानी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वार्ड भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून साप्ता. बेरार टाईम्स कार्यालय गोंदिया येथून प्रकाशित केले.( प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सह'त असतीलच असे नाही.)

साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



-: शुभेच्छुक :-
मा.विजयभाऊ रहांगडाले
आमदार
तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्र

BJP

साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

चाबी

-: शुभेच्छुक :-
जनतेचे आमदार
मा.विनोदजी अग्रवाल
गोंदिया विधानसभा क्षेत्र



साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



-: शुभेच्छुक :-
डॉ.परिणयजी फुके
माजी पालकमंत्री
गोंदिया जिल्हा व
भंडारा-गोंदिया विधान परिषद सदस्य

BJP

साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

BJP

-: शुभेच्छुक :-



मा.संजय पुराम
माजी आमदार
देवरी-आमगाव विधानसभा क्षेत्र

सौ.सविता पुराम
माजी सभापती, जिल्हा परिषद, गोंदिया
महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य भाजपा

# सारस पक्षी गोंदिया जिल्ह्याचा कोहिनूर



जिल्हाधिकारी गोंदिया म्हणून माझे पदस्थापनेचा आदेश माझ्या हाती पडला आणि मनस्वी आनंद झाला! विदर्भामध्ये काम करायला मिळण्याची ही माझी तिसरी संधी! पण त्यातल्या त्यात गोंदिया जिल्हाधिकारी म्हणून काम करायला मिळणार याचा अपूर्व आनंद वाटला. कारण गोंदिया जिल्हा म्हणजे नवेगांवबांध, नागझिरा, बोदलकसा, चोरखमारा, कचारगड, हाजराफॉल अशा एक ना अनेक सौंदर्य स्थळांनी नटलेला! गोंदिया जिल्ह्याच्या सौंदर्याचे अत्युच्च प्रतिक म्हणजे सारस पक्षी.

गोंदिया जिल्ह्यात प्रवेश करण्या पासूनच सारसच्या दर्शनाची आस लागली होती. रुजू होऊन काही मोजकेच दिवस झाले होते. नेहमीच्या पध्दतीप्रमाणे अवैध गौण खनिज तपासणी, तलाठी दप्तर तपासणी अशा कामा निमित्याने मी आणि माझे अपर जिल्हाधिकारी राजेश खवले परसवाडा, झिलमिली, घाटटेमणी या मध्यप्रदेशाला लागून असणाऱ्या भागांमध्ये जाणार होतो. तेवढ्यात माझे अपर जिल्हाधिकारी म्हणाले की, सद्या घाटटेमणी गावालगतच्या शेतांमध्ये सारस पक्षांनी घरटे केलेले आहे. अंडे दिलेले आहे. आणि जर आपण तिथे गेलो तर आम्हाला हमखास सारस पक्षाचे दर्शन होईल! शासकीय कामे पार पाडल्यानंतर आम्ही सारस पक्षाचे घरटे असणाऱ्या घाटटेमनी गावातील शेताला भेट देण्याचे ठरवले.

शासकीय कामे आटपून आम्ही घाटटेमणी गावाकडे निघालो. घाटटेमणीचे तलाठी श्री. शेख हे आधीपासूनच गावामध्ये हजर होते. आजचा दिवस हा पावसाळी दिवस होता. सूर्य किरणांचा प्रवेश जमिनीला होत नव्हता. ढगांच्या छत्रीने सूर्य किरणांना अडवून ठेवले होते. आम्ही प्रवास करत असतांना विविध पक्षी आम्हाला दिसत होते. गोंदिया जिल्हा म्हणजे पक्षी वैभवाने नटलेला जिल्हा. या जिल्ह्यामध्ये सुमारे ३५० प्रजातीचे पक्षी आढळतात. रस्त्याने प्रवास करत असतांना आम्हाला गाय बगळा, छोटा बगळा, मोठा बगळा, ढोकरी असे विविध पक्षी धानाच्या शेतामध्ये दिसत होते. तर कोतवाल, साळुंकी, कवडी मैना, निलपंख, कापशी घार, ठिबकेदार कबूतर, सामान्य होला असे विविध पक्षी तारेवर बसलेले दिसत होते. पक्षी वैभव न्याहाळत आणि धानाच्या शेतातील हिरवळ डोळयामध्ये साठवत आम्ही घाटटेमणी गावाकडे निघालो. मधेच पावसाची जोरदार सर येऊन गेली आणि त्यामुळे संपुर्ण परिसरामध्ये पाणी भरले होते.

गोंदिया जिल्ह्यातील शेतांचे वैशिष्ट म्हणजे आधीच या शेतामध्ये ब–यापैकी पाणी भरलेल असते आणि दोन बांदी मधील धुऱ्या वरुन आपल्याला चालत जावे लागते. परंतू जेव्हा पाऊस येतो तेव्हा दोन बांधीमधील ऊंचवटयारून चालणे देखील मुश्कील जाते. माझ्या पायामध्ये माझे नेहमीचे सँडल होत्या. परंतू निघण्यापूर्वीच मला जाणीव करुन देण्यात आली होती की मी स्पोर्टस शुज घातले पाहिजे म्हणजे पाय घसरणार नाही आणि घाट टेमणी गावात प्रवेश केल्यानंतर मला तीव्रपणे जाणवले की मी स्पोर्टस शुज घालून आले हे खूपच शहाणपणाचे काम केले आहे.

आमची गाडी घाटटेमनी गावामध्ये येऊन पोहचली. देशमुखांच्या वाडयापुढे गाडी थांबली. जुना वाडा आज रोजी भग्न अवस्थेत दिसत होता. जुने वैभव लोप पावलेले होते. परंतु जुन्या वैभवाचा साक्षिदार असलेला भला मोठा दरवाजा अजूनही तसाच उभा होता. त्या दरवाजातून एखादा हत्ती सहजपणे आत मध्ये जाऊ शकला असता. वाडयाच्या दरवाज्यातून देशमुख बाहेर आले. आम्हाला चहा पाण्याचा आग्रह केला. आधी चहा, पाणी घ्या आणि मग सारस बघायला जाऊया. परंतु आम्ही त्यांचे निमंत्रण सविनय नाकारले. थेट शेतामध्ये जावूया म्हणून त्यांना आग्रह केला. आता देशमुखांच्या वाडयापासून घाटटेमनी मधल्या त्यांच्या त्या शेता पर्यंत आमचा पायी प्रवास सुरु झाला.

ज्येष्ठ पक्षीतज्ञ श्री. मुकुंद धुर्वे हे देखील घाट टेमणी गावामध्ये हजर झाले होते. मुकुंद धुर्वे गावातील काही मंडळी, शेतकरी श्री. देशमुख आणि गोंदिया वरुन आलेलो आम्ही दोघे अशा आमच्या लवाजम्याने सारस पक्षाने घरटे केलेल्या त्या शेताकडे प्रयाण केले. धानाची रोवणी करण्याकरिता शेतामध्ये चिखलनी करावी लागते. धानाच्या शेतामध्ये सदैव पाणी भरलेले असते. त्यामुळे दोन धानाच्या बांधी मधून चालतांना अक्षरश: चिखलामधून चालल्या सारख्याच प्रवास करावा लागतो. नुकतीच पावसाची जोरदार सर येऊन गेली होती. सगळा आसमंत न्हावून निघाला होता. आजू बाजुचे नदी, नाले, ओढे यांना पुर आलेला होता आणि आम्ही ज्या शेताकडे निघालो होतो तो रस्ता चिखलमय झाला होता. ६ इंच पर्यंत आमचे पाय चिखलामध्ये रुतत होते. आजूबाजूच्या शेतांमध्ये पेरणीचे गीत गात महिला धानाची रोवणी करत होत्या. पावसाच्या पाण्याने शरीर ओले होऊ नये म्हणून त्यांनी प्लास्टिकची घोंगडी डोक्यापासून पाठीवर बांधून घेतली होती. जवळ जवळ ५०० मिटरचा चिखलमय प्रवास करुन आम्ही एका बाभळीच्या झाडाखाली येऊन पोहचलो.



तेथे देशमुखांचा नातू आधीच हजर होता. त्याने बोटाने दुरुन दिसणारा सारस पक्षी आम्हाला दाखवला. सारसाचे ते माझे पहिलेच दर्शन होते. किती रूबाबदार पक्षी होता तो! सारसाचा जोडा शेतामध्ये विहार करीत होता. सारसाने आपले घरटे देशमुखांच्या शेतामध्ये बनविले होते. अंडे दिले होते.आणि कर्तव्यदक्ष देशमुख त्या घरटया पर्यंत कुणालाही जाऊ देत नव्हते. सारसाच्या घरट्याची आम्ही प्राणपणाने काळजी घेतो असे देशमुख आम्हाला फार अभिमानाने सांगत होते. खेडेगावातील एका शेतकऱ्याच्या मनातील पक्षी संवर्धना विषयीची ती अतीव ओढ बघून मला मनोमन आश्चर्य वाटले.



**श्रीमती नयना गुंडे**
**जिल्हाधिकारी गोंदिया**

साधारणत: १०० मिटर अंतरावरुन आम्ही सारसाचे दर्शन घेत होतो. सुमारे ८ फुटा पर्यंत त्याच्या पखांचा पसारा होता. उंची जवळजवळ पाच फूट होती. गळयाच्या वरच्या भागावर लाल भडक रंग होता आणि बाकी संपूर्ण रंग पांढरा दिसत होता. पंखाच्या शेवटी करळया रंगाची पिसे दिसत होती. मधे–मधे तो पक्षी ताठ मान करत होता आणि आकाशाकडे बघत होता. त्याचा आवाज मला तुतारी सारखा वाटला. थोडया थोडया वेळाने हे पक्षी आपल्या घरटयाकडे येत होते आणि अंडयाला ऊब देत होते.

नर आणि मादीने हे काम वाटूनच घेतले होते. दुर्बिणी मधून मी हे सारे दृश्य न्याहाळत होते. पाऊस सुरूच होता. आमच्यापैकी प्रत्येकाने आपापल्या डोक्यावर छत्री धरलेली होती. सारस पक्षाला कोणताही त्रास न होऊ देता आणि फारसे जवळ न जाता आम्ही बरेच फोटो काढले. सारस पक्षाचे ते दृश्य आम्ही सर्वांनी आपल्या डोळयामध्ये साठवले. पृथ्वी तलावरील उडू शकणारा सर्वात ऊंच पक्षी म्हणजे सारस! त्याचे दर्शन आज आम्हाला घडले होते. सारसा च्या दर्शनाने आम्ही धन्य झालो होतो.

आमच्या सोबतचे पक्षी तज्ञ श्री. मुकुंद धुर्वे आम्हाला सांगू लागले, सारस हा पक्षी भार–तात गंगेच्या खो–यात, उत्तरप्रदेश, राजस्थान गुजरात, हरियाणा, आसाम नेपाल प.बंगाल या ठिकाणी नदीच्या पात्रात उथळ पाण्यात दलदलीच्या ठिकाणी तलावात आढळतो. मध्य भारतात भंडारा गोंदिया व बालाघाट जिल्ह्यात छोटा तलाव (बोडी) व भाताच्या शेतात आढळतो. हा स्थानिक पक्षी असून एकदा जोडी तयार झाल्यावर कायमस्वरूपी टिकते. त्याचा अधिवास त्याने संरक्षित केलेला असतो. त्याच्या तेवढ्या भागात दुसरे सारस पक्षी येत नाहीत. गोंदियाला लागून असलेला भंडारा व बालाघाट जिल्ह्यातही सारस आहे. म्हणजे मध्य भारतात तो गोंदिया बालाघाट जिल्ह्यात एकवटलेला आहे. बालाघाटाच्या मधील भागात व तिकडे भोपालमध्ये आहेत पण खालच्या भागात संपूर्ण दक्षिणेकडे कुठेच नाहीत.

सारस हा क्रौच काळात कुळातला सर्वात मोठा क्रौच आहे. जगातला सर्वात मोठा उडणारा पक्षी, लांबसडक गुलाबी पाय, आणि उंच मान, यामुळे पूर्ण वाढ झालेल्या सारसाची ऊंची पाच फुट म्हणजे जवळपास माणसा एवढी भरते . दोन्ही पंखाचा पसारा ८ फुटापर्यंत असतो. शिंगाच्या रंगाची चोच मात्र शरीराच्या मानाने लहान वाटते! त्याच्या मस्तकाच्या काही भागावर पिसे नसल्याने टकलासारखे दिसते . गळ्याच्या वरचा भाग यावर लालभडक पिसे आणि चेह–यावर लांब काळे केस तुरळकपणे दिसतात. बाकीचा गळा पांढरा आणि पाठ पोट व पंखावर निळसर राखी पिसे असतात. पंखाच्या शेवटी गडद करड्या रंगाचे पिसे असतात. शेपटीकडील पिसे पांढरे असतात.

क्रौच उडताना ताठ मान सरळ करुन आणि पाय एका रेषेत मागे करुन उडतात. तुतारीसारखा उच्च स्वरातला निनादणारा आवाज या क्रौंचाचे वैशिष्ट्ये! हा आवाज ते जमिनीवर हिंडताना, उडताना आणि एकमेकांना सामोरे जाताना काढतात. नर मादी दोघे मिळून जेव्हा अशी साद घालतात तेव्हा व्दंदगीत गाणारे हे जोडपे अतिशय सुंदर दिसते. क्रौचाच्या शरीरातले ध्वनियंत्र आकाराने बिगुलासारखे असते.

घरटी बांधतांना धारांच्या शेताची किंवा पाणथळ जागेची निवड केली जाते. पाणी जसे जसे वाढायला लागते तसे तसे सारसाचे घरटे पाण्यावर तरंगायला लागते. नर आणि मादी दोघे मिळून अंड्याचे प्राणपणाने संरक्षण करतात. पिल्ले उडायला लागेपर्यंत नर आणि मादी त्याच ठिकाणी राहतात. शेतातील किटंकासोबत धानाच्या ओंब्या खा–तात. धानाची कापणी झाल्यावर ते छोट्या तलावाकंडे स्थलांतर करतात. मे महिन्यात तलावातील अन्न व पाणी संपल्यावर ते नदीच्या पात्रात स्थलांतर करतात. याप्रमाणे अन्नासाठी ते ब–याच वेळा गोंदिया जिल्ह्यात तर कधी बालाघाट जिल्ह्यात स्थलांतर करतात. म्हणजेच फक्त स्थानिक जागेतच स्थलांतर करतात.

हा पक्षी कीटक भक्षी तसाच तृण भक्षी देखील आहे. याच्या आहारात छोटे किटक, छोटे झिंगे, मासे, छोटे साप, सरडे, बेडूक, तसेच पाणवनस्पती, छोट्या झाडाच्या बिया, गवताच्या मुळातील कंद, बिया, धान, गहू, यांच्या बिया, कमळकंद, बोळूंदा, छोटे कासव, घोगले, धानावरील किडे, नाकतोडे, पाण्यावरील किडे यांचा समावेश होतो. सोबतच सारस गाद वनस्पतीचे कोवळे शेंडे पण खातात.

श्री धुर्वे पुढे आम्हाला सांगू लागले एकाच ठिकाणी ८,१२,२४ अशा संख्येत त्यांनी सारस पक्षी बघितले आहेत. याला सारसाचे संमेलन म्हणतात. वर्षभराच्या कालावधीत सारस पक्षी आपल्या कुटूंबासह एक किंवा दोनदा एकत्र येतात. ह्यात पिल्ले व वयात आलेले सारस असतात. जोडी तयार झालेले म्हणजे वयस्क सारस त्यांच्या घरट्यांच्या परिसरात किंवा नदीच्या पात्रात एकत्र येतात. मग त्यांचा शांतपणे सांकेतिक भाषेत संवाद सुरू होतो. त्याप्रमाणे ३ ते ४ दिवस रोज सायंकाळी साधारत: ४ वाजल्यानंतर एकत्र येतात. पौढ सारस आपल्या तरूण सारसांची भेट घालवून देतात. हे संमेलन (congregation) म्हणजे त्याच्या जीवनातील एक महत्त्वाचा क्षण असतो.

त्यातच ते आपला जोडीदार निवडतात. एकदा जोडीदार निवडला की ते शेवटपर्यंत एकत्र नांदतात. म्हणूनच त्यांना प्रेमाचे प्रतिक मानतात. जोडी तयार झाली की ते मधुर कुंजन करतात, जोडीने एकमेकांचा अनुनय करतात. त्यांचे नृत्य मोठे मनोहर असते. प्रत्येक युगल एकमेकांना साथ देतो. ते मान वेळावून डोके खाली करीत तर कधी मागे मान मागे पाठीला स्पर्श करतात. नंतर एकदम माना उंच करतात तसेच दोन्ही पंख पसरवून ऊंच उडी घेतात तर कधी पंख फडफडवीत स्वत: भोवती एक गिरकी घेतात. तर कधी एकमेकांसमोर उभे राहून हवेत उंच उडी घेतात व माना वर करुन एकत्रित कुंजन करतात.यात साधारणत: मादी एका ठिकाणी मान वर करुन उभी असते.

तर नर उंच उड्यामारून पंख पसरवून असतो. मादी नरा–पेक्षा आकाराने व उंचीने थोडी लहान असते. अशाप्रकारे यांचे स्वयंवर झाले की ती जोडी आयुष्यभर टिकते. जोडीतला एक जण मरण पावला तर दुसरा व्रतस्थ आयुष्य जगतो. नृत्य करतांना छोट्या काटक्या, वनस्पतीचे पाने फेकून मारतात, एकमेकाभोवती गोल–गोल फिरत मान वर खाली करत उंच उड्या मारतात. धानाच्या शेतात पाणी असलेल्या बांधीत जेव्हा हे नृत्य करतात तेव्हा उंच उडी घेतांना पाण्यात पाय आपटून पाण्याचे थेंब उडवितात. हे दृष्य फारच मन मोहणारे असते. आपला थकवा किंवा ताण दूर करण्यासाठी सुद्धा सारस नृत्य करतात.

असा हा सारस पक्षी आज संकटात सापडलेला आहे. मानवाव्दारा केल्या जाणारी शिकार, शेतातून हुसकून लावणे, घरटे विस्कटून टाकणे, पक्षांना पळवून लावणे, विद्युत तारांमुळे होणारे मृत्यू, संकुचित होत जाणारा अधिवास, किटक नाशकांचा अत्याधिक वापर अशा विविध कारणांमुळे सारस पक्षांची संख्या कमी होत आहे. गोंदिया जिल्ह्यातील पक्षीप्रेमी मंडळी सारस पक्षाच्या संर्वधनासाठी अतिशय मोलाचे काम करत आहेत. त्यांनी मोठ्या प्रमाणावर जनजागृती घडवून आणलेली आहे. जिल्हा प्रशासनाने देखील सारस पक्षी ज्या शेतक–यांच्या शेतीमध्ये घरटे करेल त्या शेतकऱ्याला आणि १ कि.मी परिसरातील शेतकऱ्यांना अनुदान देण्याची योजना कार्यान्वित केलेली आहे. या सर्व कारणांमुळे सारस पक्षांच्या संख्येमध्ये काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

सारस पक्षी गोंदियाचे वैभव आहे. गोदियाचेच कशाला हे तर पूर्ण महाराष्ट्र आणि भारताचे देखील वैभव आहे. गोंदिया जिल्ह्यातील पक्षीप्रेमी आणि गोंदिया जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून हे पक्षी वैभव जपण्याचा निर्धार करून आम्ही आमच्या परतीच्या प्रवासाला निघालो. मात्र त्या घाटटेमनी गावातील धानाच्या शेतात बघितलेला सारस पक्षाचा जोडा सदैव डोळयापुढे येत होता. त्या गोड स्मृती घेऊनच आम्ही गोंदियाला परत आलो. अजूनही ते दृश्य डोळ्यापुढून हटत नाही. गोंदिया जिल्ह्याचा कोहिनूर असणाऱ्या सारसाला मी माझ्या डोळ्यात कायमस्वरूपी साठवले आहे.

**बेरार टाईम्सच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हावासीयांना शुभेच्छा!**


साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक व
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
व सोनी जिल्हा परिषद
क्षेत्रातील
सर्वांचे मन:पूर्वक
आभार
पंकज रहांगडाले
नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य
सोनी


साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक व
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
व गोटाबोडी पंचायत
समिती क्षेत्रातील
सर्वांचे मन:पूर्वक
आभार
अनिल दसाराम बिसेन
नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य
गोटाबोडी


साप्ताहिक व न्युज
पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक व
प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
व तिरखेडी
जिल्हा परिषद
क्षेत्रातील जनतेचे
आभार
सौ.विमल बबलू कटरे
नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य
तिरखेडी क्षेत्र,पं.स.सालेकसा


साप्ताहिक, न्युज पोर्टल
बेरार टाईम्स के
वर्धापन विशेषांक एवं
गणतंत्र दिन की
हार्दिक शुभकामनाएं!
सभी मतदाताओ का
बहोत बहोत धन्यवाद
लक्ष्मी रविशंकर तरोणे
नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य
आसोली क्षेत्र,पं.स.गोंदिया

# गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी संस्था मर्या.गोंदिया र.नं.१०२

## साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्सच्या वर्धापन अंक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

### संस्थेची स्थिती

१. कर्ज मर्यादा २० लक्ष रुपये (आकस्मिक कर्ज धरुन)
२. सभासद कर्जावर व्याज १०%
३. अहवाल वर्षात एकुण सभासद संख्या-१७८४
४. अहवाल वर्षात संस्थेचे भागभांडवल जमा रू.९,९८,४८,२८०/-
५. अहवाल वर्षात संस्थेत सभासदांची ठेव जमा रू.२५,७०,५१,३७२/-
६. अहवाल वर्षात संस्थेचे सभासदांवर बकाया कर्ज रू.४३,५६,१९,९८७/-
७. अहवाल वर्षात संस्थेकडे सहकारी बँक़ेची कर्ज बकाया रू.निरंक.
८. अहवाल वर्षात सहकारी बँक हिस्से रक्कम जमा रू.३६,८६,०००/-
९, अहवाल वर्षात संस्थेत सभासद कल्याण निधी जमा रू.१८,९१,५२२/-
१०. अहवाल वर्षात संस्थेत राखीव निधी जमा रू.३,१४,७२,८२६/-
११. गोंदिया डिस्ट्रीक्ट से.को.ऑप.बँकेत मुदती ठेव जमा रू.४,०७,६६,४८५/-

### संस्थेच्या योजना

१. मृत सभासदांच्या कुटुंबियांना रू.१५,०००/- ची तातळीची आर्थिक़ मदत.
२. दर सहा महिन्यात सेवानिवृत्त सभासदांचे शाल-श्रीफळ,साडी-चोळी व रू.५०००/- चे धनादेश देवून सत्कार करण्यात येते.
३. रूपये पाच लक्ष व त्यावरील कर्ज घेतल्यास अशा सभासदांचा एस.बी.आय.इन्सुरंश कंपनी तर्फे विमा काढून त्यांच्या कर्जाला संरक्षण प्रदान करण्यात येते.
४. अपघातात मृत झालेल्या सभासदांना जनता अपघात विमा योजनेअंतर्गत रू.५ लक्ष ची आर्थिक मदत.
५. संस्थतर्फे एस.एम.एस.बॅकींग (कोअर-बँकींग) सुविधेचा लाभ संस्थेच्या सभासदांना देण्यात येत आहे.
६. कुटुंब कल्याण निधी योजनेअंतर्गत मृत झालेल्या सभासदांच्या वारसानांना त्यांच्या जम रकमेच्या (२५०००X२०)=५,००,०००/- पट रक्कम परत करण्यात येते.



श्यामराव एस.बुद्धे — अध्यक्ष
विजय.जे.मडावी — उपाध्यक्ष
संजय बनकर — सचिव



देवदास एच.नान्हे — शाखा प्रमुख सडक अर्जुनी
जी.जी.ठाकुर — संचालक इ.मा.व
सौ.वंदना एस.चौधरी — संचालक जिल्हा गट महिला
कु.शांता आर.उईके — संचालक जिल्हा गट महिला
कु.मंजुषा डी.चौधरी — संचालक जिल्हा गट महिला
श्रीमती वनिता एम.ठाकुर — संचालक वर्ग ४ मधून महिला



लिलाधर के.तिबुडे — संचालक वर्ग ४ गट पुरुष
पी.एम.कागदीमेश्राम — संचालक वि.जा.भ.ज.
श्यामकुमार आर.लिचडे — संचालक जि.प.गोंदिया
प्रदीप व्ही.मेंढे — संचालक जि.प.गोंदिया
दिलीप एम.खोटेले — संचालक पं.स.आमगाव
खिलेन्द्र एच.बिसेन — संचालक पं.स.गोंदिया



दयानंद जी.फटिंग — संचालक पं.स.गोंदिया
नरेन्द्र डी.अतकरे — संचालक पं.स. तिरोडा
सचिन व्ही.कुथे — संचालक पं.स.मोर.अर्जुनी
सुभाष एस.सिरसाम — संचालक पं.स.सडक अर्जुनी
सतिश एल.कांबळे — संचालक पं.स.गोरेगाव
पी.आर.सैय्यद — तंज्ञ संचालक पं.स.आमगाव
कमलेश व्ही.बिसेन — तंज्ञ संचालक पं.स.आमगाव



संस्कृत भाषेतील एक सुप्रसिद्ध नाटककार/कवी भवभूती, महानुभाव पंथाचे एक प्रवर्तक चक्रधर स्वामी, तसेच पाच नद्यांच्या संगमावर स्थित आंभोरा येथे मराठीतील आद्यग्रंथ विवेकसिंधू या अद्वितीय ग्रंथाचे रचयिता मुकूंदराज यांचे पाय ज्या झाडीपट्टीत स्थिरावले होते, त्या झाडीपट्टीत पत्रकारितेची तशी सलग परंपरा वा इतिहास मात्र आढळून येत नाही. अशा आमच्या या झाडीपट्टीतून पोवार समाजातील एका युवकाने "बेरार टाईम्स" सारखे डिजिटल/प्रिंट वृत्तपत्र सुरू करुन दहा वर्षे यशस्वीपणे चालवून दाखवणे, ही एक ऐतिहासिक वस्तुस्थितीच म्हणावी लागेल. या वृत्तपत्रातील बातम्यांची निष्पक्ष, सर्वसमावेशक व विश्लेषणात्मक मांडणी आज संपूर्ण महाराष्ट्रात नावाजली जातेय, हे या वृत्तपत्राचे विशेष वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.
अशा आमच्या या लाडक्या "बेरार टाईम्स"च्या यशस्वी दशकपूती संबंधाने या वृत्तपत्राला, खेमेन्द्र कटरे व त्यांच्या सुविद्य चमूला खूप खूप शुभेच्छा.

**ॲड.लखनसिंह कटरे**
(निवृत्त डीडीआर), बोरकन्हार, जि.गोंदिया



साप्ताहिक बेरार टाईम्स, बेरार टाईम्स न्युज पोर्टल हे समाजातील समस्यांना वाचा फोडण्याचे उत्तम कार्य करीत आहेत. अल्पावधितच आपले साप्ताहिक व न्युज पोर्टल जनमानसात लोकप्रिय ठरले असुन निर्भिड लेखणी ही आपल्या वृत्तपत्राची व पोर्टलची ओळख ठरली आहे. साप्ताहिक बेरार टाईम्सचा १० व्या वर्धापन दिनानिमित्त आपले व आपल्या सर्व सहकारी चमुचे मनस्वी अभिनंदन. भविष्यात उत्तरोत्तर प्रगती करावी, हीच सदिच्छा.

**इंजि. राजकुमार बडोले**
माजी पालकमंत्री गोंदिया



गेल्या १० वर्षापासून सातत्य राखत कुठल्याही पक्षाला बांधिल न राहता निष्पक्षपणे सर्व पक्षांच्या घडामोडी जनतेसमोर ठेवण्याचे काम साप्ताहिक बेरार टाईम्स, बेरार टाईम्स न्युज पोर्टल करीत आहे. समाजातील समस्यांना वाचा फोडण्याचे उत्तम कार्य शुरू असून न्युज पोर्टल ने शासकीय योजनांना लगेच जनते पर्यंत पोहोचविल्याने अल्पावधितच साप्ताहिक व न्युज पोर्टल जनमनसात लोकप्रिय ठरले आहे.

**विजय रहांगडाले**
आमदार
तिरोडा-गोरेगाव मतदार संघ



साप्ताहिक बेरार टाईम्स, बेरार टाईम्स न्युज पोर्टल सातत्याने समाजातील समस्यांना वाचा फोडण्याचे उत्तम कार्य करीत असून न्युज पोर्टलच्या माध्यमातुन राज्यातील व जिल्ह्यातील घटना घडामोडी जनतेपर्यंत त्वरीत पोहोचविण्याचे कार्य अभिनंदनिय ठरले आहे. साप्ताहिक व पोर्टलने गेल्या १० वर्षात शासकीय व गैरशासकीय योजनांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक सलोखा जपण्याचे काम केले तसेच राजकीय विश्लेषणात विशेष छाप सोडली आहे.

**राजेंद्र जैन**
माजी आमदार

# गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था,मर्या.गोंदिया र.नं.०१

कार्यालय बजरंग नगर, राजगोपाल वॉर्ड, गोंदिया ता.गोंदिया-४४१६०१

## संस्थेच्या सर्व सभासदांना प्रजासत्ताकदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्री.विरेंद्रकुमार अ.कटरे — अध्यक्ष
श्री.शंकरलाल ग.नागपुरे — उपाध्यक्ष

**श्री. सुरेश या. वासनिक**
व्यवस्थापक

### -:संस्थेची वैशिष्टये :-

१) संस्थेचे संपूर्ण कामकाज संगणीकृत, २) नियमित कर्ज १५,००,०००/रुपये ३) वस्तुरुप कर्ज (१५ लक्षाच्या मर्यादेत) ४) ऑकस्मीक कर्ज ५०,०००/- रु(१५ लक्षाच्या मर्यादेत.) ५) मृत सभासदांच्या वारसदारांना वेळीच २५ हजार रुपये सभासद कल्याण निधीची मदत ६) ठेव तारण कर्ज ठेवीच्या ८० टक्के ७)सुरक्षा फंड योजने अंतर्गत मृत सभासदांचे ७ लक्ष रुपयापर्यंतचे कर्ज माफीची योजना ८)सभासंदाना अतिरिक्त ठेव कपात करण्याची संधी व त्यावर आकर्षक व्याज दर.

**संचालक मंडळः-** श्री.नागसेन न.भालेराव (शाखाध्यक्ष गोंदिया), कु. ओमेश्वरी ओ.बिसेन (शाखाध्यक्ष आमगाव), श्री.योगेश्वर श्र.मुंगुलमारे (शाखाध्यक्ष कोहमारा), श्री. शंकर झा.चव्हाण (संचालक पं.स.गोरेगाव), श्री पवनकुमार प्र.कोहळे (संचालक पं.स.अर्जुनी मोरगाव), कु, सुमेधा त. गजभिये (संचालिक पं.स.तिरोडा), श्री. निलकंठ भै. बिसेन (संचालक पं.स.आमगाव), श्री. किशोर बा.डोंगरवार (संचालक पं.स.सडक अर्जुनी), श्री. प्रदीप ठु.रंगारी (संचालक पं.स.तिरोडा), श्री. संदिप ई. तिडके (संचालक पं.स.देवरी), तसेच संस्थेचे लेखापाल सहा.लेखापाल, अंत तपासणीस, सर्व; शाखा व्यवस्थापक व कर्मचारी वृंद.



साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



श्री. दिपक कदम
उपाध्यक्ष
गोंदिया जिल्हा मजुर सह.संघ

सौ.भावनाताई कदम
अध्यक्ष
भारतीय जनता पार्टी महिला आघाडी जि.गोंदिया



साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

व नवेगावबांध जिल्हा परिषद क्षेत्रातील

सर्वांचे मनःपूर्वक आभार

सौ.रचनाताई चामेश्वर गहाणे
नवनिर्वाचित जि.प.सदस्य नवेगावबांध

---

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा!



-: शुभेच्छुक :-

मुनेश रहांगडाले
सरपंच ग्राम पंचायत तांडा
तालुकाध्यक्ष
सरपंच संघटना गोंदिया तालुका
नवविर्वाचित पंचायत समिती सदस्य

---

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा!

-: शुभेच्छुक :-

अजीत टेंभरे
उपसरपंच
ग्राम पंचायत चुटिया
युवा मोर्चा विधानसभा प्रमुख
जनता की पार्टी



---

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

अन्न औषध व प्रशासन विभाग गोंदिया

---

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



इंजि.प्रदीप रहांगडाले
उपविभागीय अभियंता
लघु सिंचन उपविभाग तिरोडा, जि.प.गोंदिया

---





साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

व एकोडी जिल्हा परिषद क्षेत्रातील

सर्वांचे मनःपूर्वक आभार

सौ.अश्विनी रवीकुमार पटले
नवनिर्वाचित जि.प.सदस्य एकोडी

---

जिल्हा परिषद चुनाव में सभी मतदाताओ सहित कांग्रेस के कर्मठ कार्यकर्ताओ को नमन, मेरे साथ खड़े उस प्रत्येक व्यक्ति को धन्यवाद जिन्होंने मुझे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूप से सहयोग व स्नेह प्रदान किया,
आप सभी का मनःपुर्वक
आभार

बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



जितेंद्र कटरे
सदस्य-जिल्हा परिषद गोंदिया

---

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



व मुंडीपार जिल्हा परिषद क्षेत्रातील

सर्वांचे मनःपूर्वक आभार

डॉ. लक्ष्मण भगत
नवनिर्वाचित जि.प.सदस्य मुंडीपार

---





साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

व सुकडी जिल्हा परिषद क्षेत्रातील

सर्वांचे मनःपूर्वक आभार

जगदीश (वालू) बावनथडे
नवनिर्वाचित जि.प.सदस्य सुकडी ता.तिरोडा

ग्राम पंचायत गर्रा बु.च्यावतीने

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



श्री.कुलदीप पटले – सरपंच
श्री.आशीष मिश्रा – उपसरपंच
के.आर.धांडे – ग्रामविकास अधिकारी

सदस्यगण: मनोज बोरकर, गमचंद तुरकर, मिनेश्वरी भगत, उषा बरडे, सविता राऊत, शीला तिघारे, सरीता तांडेकर, सुरेश कुथीरकर, ललिता टेकाम, रूपचंद नागरिकर-परिचर, योगेश न्यायकरे-संगणक चालक, मधुकर पटले-रोजगार सेवक

घरकर वेळेवर भरावे, शौचालयाचा वापर करावे, कोरोनापासून बचावाकरीता लस घ्या, झाडे लावा, झाडे जगवा.

ग्राम पंचायत लंबाटोला(गिरोला)च्यावतीने

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



योगराज ठाकरे – सरपंच
दिलीप गिरी – उपसरपंच
एन.एच.येडे – सचिव
मनोहर कावडे – सदस्य
राजकुमार भुते – सदस्य



प्रती सौंदरकर – सदस्या
श्यामकला देशमुख – सदस्या
रामबंती मेश्राम – सदस्या
ममता ठाकरे – सदस्या
धनेश रावते – सदस्य
सिता कुसराम – सदस्या
देवराम देशमुख, दिनेश देशमुख, राधेलाल बेंदरे

घरकर वेळेवर भरावे, शौचालयाचा वापर करावे, कोरोनापासून बचावाकरीता लस घ्या, झाडे लावा, झाडे जगवा.

ग्राम पंचायत मुंडीपारच्यावतीने

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



श्री.सुमेंद्र तुकाराम धमगाये – सरपंच
जावेद अरयुब खान (राजा) – उपसरपंच
अरविंद किसन सारवे – ग्रामसेवक

घरकर वेळेवर भरावे, शौचालयाचा वापर करावे, कोरोनापासून बचावाकरीता लस घ्या, झाडे लावा, झाडे जगवा.

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



-:शुभेच्छुक:-
ॲड.सचिन बन्सोड
गोंदिया

ग्राम पंचायत सेजगाव (खुर्द) पं.स.गोंदिया च्यावतीने

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




सौ.अर्चना कंसरे – सरपंच
प्रमोद पटले – उपसरपंच
प्रिती सारवरे – सचिव
संतोष पटले – सदस्य
भरत टेकाम – सदस्य



राकेश खरोले – सदस्य
सोनुताई चिखलोंढे – सदस्य
आशाताई चिखलोंढे – सदस्य
भुमेश्वरी बिसेन – सदस्य
अनिता रहांगडाले – सदस्य

घरकर वेळेवर भरावे, शौचालयाचा वापर करावे, कोरोनापासून बचावाकरीता लस घ्या, झाडे लावा, आपला परिसर स्वच्छ ठेवा, हात धुवा, सॅनिटाईजरचा वापर करा

# तिथे कर माझे जुडती!




गोंदियाच्या पूर्व दिशेला संथगतीने वाहणारी पांगोली नदी आणि नदीपासून काहीश्या अंतरावर महामानवार्य स्मरण करून देणारे भीमघाट हे आता नावारूपाला येत आहे. भीमघाट हे गोंदियावासीयासाठीच नाही तर संपूर्ण जिल्ह्याचे श्रद्धास्थान झाले आहे. भीमघाट म्हणजे भिमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना याची जाणीव करून देत आहे. गोंदिया जिल्ह्यातील हजारो भीमसैनिक पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून डॉ.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनी त्यांना नतमस्तक होण्यासाठी येतात. प्रत्येक वर्षी इथं ६ डिसेंबरला या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आम्हा सोडून गेले आता आमचा वाली कुणीच उरला नाही. असे आठवून संपूर्ण देश गहिवरून रडू लागला. तो दिवस ६ डिसेंबर १९५६ होता. आपणही बाबासाहेबांचे चरणस्पर्श करू या भावनेने गोंदिया येथील अर्जुन गजभिये, कुंडलिक बडगे, संपत फुले, वामनराव गजभिये, फत्तू नागदेवे, तानबा बनसोड असे कार्यकर्ते मुंबईला गेले. त्यांनी बाबांच्या अस्थी आणून स्मृतिस्तंभ तयार केला. यासाठी तत्कालीन मालगुजार पुरणसिंह बिसेन यांनी भुमीदान दिली. या स्थळाला आता भीमघाट म्हणून ओळखले जाते. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीस्तंभाने पावन झालेली भूमी विकसित करण्यासाठी काही तरुण एकत्र येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती निर्माण करण्यात आली.

सन १९९३ पासून या समितीचे अविरत काम सुरू आहे. सुमारे दीड एकर क्षेत्रफळाचा हा भूभाग असून येथील रमणीय बाग तसेच डॉ..बाबासाहेब आंबेडकर अध्ययन व संशोधन केंद्राची भव्य इमारत, व्यासपीठ आणि गगनचुंबी अशोक स्तंभ यामुळे हा परिसर बाबासाहेबांना मानवंदना देण्यासाठी प्रेरणास्थळ ठरला आहे. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री व गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राजकुमार बडोले यांनी भीमघाट परिसराचा विकास करण्याकरिता अत्यंत मोलाची कामगिरी करून एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला. येथील अशोक स्तंभ निर्माण करण्याचा त्यांचाच ध्येय होता. हा अशोक स्तंभ निर्माण करण्याचे काम पुणे इथल्या अशोक सर्वांगीण विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक शीलवंत यांच्या बुद्धीचातुर्याने या अशोकस्तंभाची उभारणी झाली. २२ जानेवारी २०१७ रोजी भूमिपूजन करण्यात येऊन २८ मे २०१७ रोजी लोकार्पण झाले. यावेळी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, मंत्री राजकुमार बडोले, डॉ. प्रशांत पगारे, बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष चंद्रबोधी पाटील, नगराध्यक्ष अशोक इंगळे, सभापती घनश्याम पानतावणे प्रामुख्याने उपस्थित होते. तर भूमिपूजनासाठी माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे, नगरसेविका कुंदा पंचबुद्धे, दीपिका रुसे, हेमंत पंधरे उपस्थित होते. या स्मृतिस्तंभाचे दर्शन घेण्यासाठी राजकीय मंडळींनी हजेरी लावून आर्थिक मदत करतात.

यामध्ये खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार गोपालदास अग्रवाल, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड.के.आर. शेंडे, याचबरोबर माजी नगराध्यक्ष श्रीमती सुशीला भालेराव आणि गोंदिया नगर परिषदेचे मोठे आर्थिक योगदान आहे. हा परिसर आंबेडकरी विचारधारेचे केंद्रबिंदू व्हावे आणि संबंध राज्यातून भीमसैनिकांनी येऊन बाबासाहेबांना मानवंदना द्यावी असा आपला उदात्त हेतू असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे पदाधिकारी श्याम चौरे यांचा मानस आहे. कार्यक्रम ाच्या दिवशी बाबासाहेबांना म ानवंदना देण्यासाठी लोकांच्या रांगा लागतात. पांढरे शुभ्र वस्त्र घालून येणाऱ्या भीमसैनिकांच्या जयभीम च्या घोषणांमुळे हा परिसर निनादून जातो. यावेळी संगीत कलेच्या माध्यमातून आंबेडकरी विचारांची जाणीव होऊन मी आंबेडकरवादी याची आत्मप्रौढी लाभते. इथे कर माझे जुळती असा निर्धार जो–तो करतो. सदर परिसराचे कार्य जोम ाने वाढविण्यासाठी भीमघाट स्मारक समितीचे अध्यक्ष व संचालक म ंडळातील सदस्यांचे अद्यापही प्रयत्न सुरुच आहेत.

**पृथ्वीराज कोल्हटकर**
गोंदिया, ९०४९९८७५७४

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छुक :-
श्री. संजय गणवीर
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
महिला बाल कल्याण विभाग
जिल्हा परिषद, गोंदिया

# मनुष्य संसाधन ;शाश्वत विकासाची एक संधी



**मागासभागांचा विकास हा शासन, प्रशासनासह राज्यकर्त्यांसाठी एक आव्हान ठरला आहे. नैसर्गिक संसाधने उपलब्ध असतानासुद्धा रोजगाराच्या संधी या भागात पाहिजे त्या प्रमाणात नाहीत. परिणामी, मनुष्य ऊर्जा ही उत्पादकतेच्या दृष्टीने वाया जाते. शासनस्तरावर या भागातील मागासपणा दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. तरीही विकासाची गती मंद करणाऱ्या अनेक अडचणी मार्गात आहेत. त्यासाठी शैक्षणिक, सामाजिक प्रगल्भतेची कमतरता हा एक घटक कारणीभूत असू शकतो. मनाने अत्यंत उदार आणि निर्मळ असलेल्या येथील जनतेच्या विकासाची स्वप्ने पाहणारा एक उमदा तरुणाने या भागात तालुकाप्रमुख म्हणून काम केले आहे. ही देवरी तालुकावासींसाठी जमेची बाजू आहे.**

**मागास, दुर्गम क्षेत्र आणि राज्य मुख्यालयापासून अत्यंत दूर टोकावर वसलेल्या देवरी तालुक्यासारख्या भागात शंभर टक्के निस्तार वाटपाचे काम अत्यंत झपाट्याने पूर्ण झाले. तालुक्याचा विकास या विषयावर सतत झपाटल्यागत कृतिशील चिंतन करणारा अधिकारी म्हणून तत्कालीन तहसीलदार प्रताप वाघमारे राहिले. बेरार टाईम्स वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'मागास भाग आणि विकासाची संधी' या विषयावर साप्ताहिक बेरार टाईम्सचे सहसंपादक सुरेश भदाडे यांनी श्री.वाघमारे यांचेशी साधलेला हा संवाद.**

'लोकसंख्या प्रस्फोट' या संकल्पनेमुळे स्तब्ध होणाऱ्या नियोजनाने आता वाढती लोकसंख्या ही समस्या न मानता लोकसंख्येस मानव संसाधन समजून आपली दिशा विकासाभिमुख केली आहे. जगातील सर्वांत तरुण राष्ट्र अर्थात कामकरी वयोगट सर्वाधिक असणारी लोकसंख्या सध्या आपल्या देशात आहे. या लोकसंख्येचा लाभांश मिळवायचा असेल तर अत्यंत मूलगामी व सूक्ष्म अशा पायाभूत नियोजनातून ममनुष्य संसाधनफ विकास आपणास साध्य करावा लागेल.

'लोकसंख्या' ही 'मानव संसाधन' या स्वरूपात जर रुपांतरित करायची असेल, तर सर्व स्तरावर या लोकसंख्येवर पैलूदार विकास संस्कार आपणास करावे लागतील. निव्वळ लोकसंख्या म्हणून वावरणाऱ्या जनतेस ममनुष्य संसाधनफ म्हणून पैलू पाडून अशा मनुष्य संशाधनास अर्थव्यवस्थेशी जोडून त्याच्या उत्पादकतेचा, कौशल्याचा लाभ घेऊन विकास पातळी उंचावणे, अत्यंत महत्त्वाचे असेल. मात्र यात एकच जोखीम आहे. मनुष्य संसधानाचा साठा करून ठेवता येत नाही. मनुष्य संसाधन हे मनुष्य योग्य वेळेतच वापरून घ्यावे लागते. अन्यथा हे मनुष्य संसाधन समस्या बनून विकासाची फळे फस्त करून टाकेल.

विकास आणि उपलब्ध मनुष्य संसाधन यांचा समन्वय साधून त्यांना परस्पर पूरक बनविणे, ही आजच्या शासन, प्रशासन, नियोजनकर्ते, विविध समाजिक संस्था यांच्या समोरील प्रमुख आव्हान आहे.

गोंदिया, देवरी सारख्या क्षेत्राचा विचार करता येथील स्थानिक जनतेचा विकास जर साध्य करायचा असेल, तर यात उपलब्ध मनुष्य संसाधनांचा महत्तम वापर करण्यासाठी आपणास दोन गटात वर्गवारी करणे अनिवार्य आहे. प्रथम म्हणजे जी लोकसंख्या ज्या अवस्थेत आहे, तिची उत्पादक ऊर्जा वाया जाऊ नये म्हणून तत्काळ तिला उत्पादक कामाचा पुरवठा करणे अथवा संधी उपलब्ध करून देणे. दुसरा म्हणजे कामकरी गटात भावी काळात येऊ शकणाऱ्या लोकसंख्येस विविध कौशल्य प्रदान करून त्यांच्या विकास संधी वाढविणे.

सामान्यतः महाराष्ट्राच्या अत्यंत पूर्वेस असणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती उदा. जंगले, पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून स्थानिक जनतेच्या विकासासाठी तत्काळ या दोन घटकास विकासाचे मूलाधार म्हणून आपणास वापरता येईल. 'वनहक्क कायदा, २००७' अंतर्गत येथील प्रत्येक गावास जंगलावरील निस्तारहक्क प्रदान करण्यात आले असून व नगौणउपज संकलन, उपभोग व विल्हेवाटीचे अधिकार, वनव्यवस्थापनाचे अधिकार व जलसंपदेवरील अधिकार हेही देण्यात आले आहेत.

मात्र निव्वळ अधिकार प्रदान करून विकास होत नाही, तर प्राप्त अधिकारास पायाभूत मानून गाव समाजाने पुढाकार घेऊन आत्मभानी, एकत्रित व शाश्वत विकासाचे सूक्ष्म आणि सर्व समावेशक नियोजन आखणे महत्त्वाचे आहे. यासाठी स्थानिक पदाधिकारी, विकासाच्या यंत्रणा, गावसमाज, सामाजिक कार्यकर्ते व विविध स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

जंगलातून प्राप्त होणाऱ्या विविध व नगौणउपजावर आधारित प्रक्रिया उद्योगाची निर्मिती ही या परिसरात विकासगंगा आणू शकते. उदा. या तालुक्यातील काही गावात आता मोठ्या प्रमाणात पत्रावळी उद्योग सुरू झाला असून त्यामुळे मनुष्य संसाधन वाया जाण्याची भीती कमी होत चालली आहे. झाडू बनविण्याचे उद्योग त्याचा विस्तार हळूहळू होत आहे.

प्रशासनाकडून पुढाकार घेऊन दरवर्षी वनवणवा लावून जंगलात गळणारी पाने जाळून टाकणाऱ्या लोकांना त्या गळणाऱ्या पानांपासून बॅक्टेरिया आधारित बॉयोडायनामिक फ र्टिलायझर्स अर्थात हजारो टन जैविक खत बनविता येऊ शकते, हे सप्रमाण सिद्ध करून दाखविल्याने पिपरखारी सारख्या दुर्गम गावात तरुणांनी पुढाकार घेऊन खताचे प्रकल्प लहान स्वरुपात तयार केले आहेत. अशा लहान लहान कल्पनेतून अत्यंत मोठ्या स्वरूपात प्रत्येक व्यक्तीस रोजगार निर्माण होऊ शकतो.

या परिसराचे भूषण म्हणजे येथे प्रत्येक गावात माजी मालगुजारी, प्रशासनाच्या विविध यंत्रणांनी बनविलेले व नैसर्गिक तलाव आहेत. या तलावात आज मोठ्या प्रमाणात गाळ, बेशरम सारख्या वनस्पती वाढल्याने हव्या त्या प्रमाणात पाणी उपलब्धता होत नसून त्याच्या महत्तम वापरावरही मर्यादा आल्या आहेत. या सर्व तलावाची क्षमता वाढवून त्याचा एकत्रित कृषिविकासासाठी वापर करून दुबार पिकक्षेत्र वाढविण्यासाठी वापर करून शेतीची व शेतकऱ्यांची उत्पादकता व पीक वैविध्य आपणास वाढविता येईल. तलाव खोली करणासाठी आपणास पुढील बाबींचा वापर करता येईल. यात प्रथम गाव समाजाने पुढाकार घेऊन श्रमदानातून अथवा लोकवर्गणीतून गाळ काढावा व त्या गावच्या शेतीसाठी अथवा विक्रीसाठी वापर करून त्यातून नफा कमवायचा किंवा मनरेगा सारख्या शासकीय योजनेतून तलाव खोलीकरण करता येईल. त्याहीपेक्षा उत्तम म्हणजे तालुक्यात विकास कामासाठी येणाऱ्या विविध कंपन्यांना मुरमाची आवश्यकता असते. त्यांना मुरूम हवा असल्यास त्यांनी ग्रामपंचायतीस अर्ज करावा. ग्रामसभेने मान्यता दिल्यास त्यांनी शासनास रॉयल्टी रक्कम भरून तो गाळ काढावा. यातून शासन पर्यायाने त्या गावास महसूल प्राप्तीही होईल व गाळही काढला जाऊन तलाव खोलीकरण होईल. यातून गावातील मनुष्य संसाधनाची बचत होऊन त्याच काळात हे मनुष्य संसाधन इतरत्र वापरता येईल. पाणीसाठा वाढल्याने याचा अंतर्गत मासेमारीसाठी मोठ्याप्रमाणात वापर करता येईल.

या तालुक्यात असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण जास्त आहे. मात्र नुकतेच जिल्हा प्रशासनाने अशा विविध कामगारांस संघटित क्षेत्रात आणण्यासाठी विशेष आराखडा तयार केला असून या कामगारास कामगार कल्याण योजनांचे लाभ भविष्यात मिळू शकतील.

या कक्षेत अपवादाने येऊ न शकणाऱ्या लोकांनाही 'आधार'च्या माध्यमातून ओळख प्रदान करून त्यांना 'आर्थिक समावेशिकरणा'च्या कक्षेत आणणे ही सर्वांची जबाबदारी आहे. आजही कित्येक बँकात खाते उघडण्यासाठी सर्व सामान्य माणसास विविध अडचणींना तोंड द्यावे लागते. पण रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या धोरणानुसार शोषित, वंचित घटकास शून्य पैशावर बँकेत खाते उघडता येईल. त्याला 'नो फ्रिल' अकाउंट असे म्हणतात. हे सर्वांनी जाणून घेतले पाहिजे.

विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे गावपातळीवर होणाऱ्या नियोजनात वास्तविकता व सर्वसमावेशकता असणे. शासनाच्या नवीन धोरणानुसार आता मनरेगा सारख्या योजनांच्या माध्यमातून गावासाठी पंचायतीच्या नियोजनाबरोबरच यंत्रणांच्या नियोजनासही ग्रामसभांची मान्यता अनिवार्य असून या संधीचा लाभ जाणकार पदाधिकारी व गावकऱ्यांनी घ्यायला हवा. नव्याने मनरेगात समाविष्ट विविध कामांचे नियोजन करावयास हवे. मात्र कधीकधी यात विरोधाभास आढळतो. ज्या गावात पाणीटंचाई आहे, त्या गावात जलसंधीकरणाच्या कामास प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे. मात्र तसे न होता तेथे रस्त्यासारख्या कामास प्राधान्य दिल्याचे दिसते. यात बदल अपेक्षित आहे.

विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या यादीत समावेश होण्यासाठी धडपडणाऱ्या सर्वसामान्यास शाश्वत रोजगार संधी निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण करून दिल्यास शासन, प्रशासन व पदाधिकारी यांच्यावरील वाढत्या अपेक्षेचे ओझे कमी होऊन स्वयंउद्यमी समाज निर्माण होईल व यातून आपण खऱ्या अर्थाने 'ग्रामराज्य' या संकल्पनेला पर्यायाने तलिम लोकशाहीला बळकटीकरण प्रदान करू शकू.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३८ प्रमाणे कल्याणकारी भूमिका स्वीकृत या देशात सर्वसामान्य जनतेचे कल्याण साध्य करण्यासाठी प्रत्येक प्रदेशाने आता आपली स्थानिक नैसर्गिक संसाधने व मनुष्य संसाधने यांचे परस्पर पूरक नियोजन करून एकिकृत विकास आराखडा आखणे, ही काळाची गरज आहे.

विकास धुरा वाहण्यासाठी ग्रामसभा सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. यातूनच आपण खऱ्या अर्थाने शाश्वत व सर्वसमावेशक विकास साध्य करू शकू व याच विकास सूत्राधारे आपण आपल्या देशाचे दुर्गम, मागास हे स्वरूप बदलून सधन, सुगम व विकसित असे रूप प्रदान करू शकू.







बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
बहुजन हिताय जगत कर्मचारी सह.पतसंस्था
खजरी/डोंगरगाव
र.न.१३२२/९५(ऑडीट वर्ग अ)

सल्लागार समीती
मा.जे.एस.रंहागडाले
अध्यक्ष
मा.एन.एन.येळे
सचिव

संचालक मंडळ
प्राचार्य खुशाल कटरे
अध्यक्ष
(९४२०९३६१३९,८०१०७२८६९२)
आर.के.कटरे
सचिव/पर्यवेक्षक









बेरार टाईम्स दशकपूर्ती सोहळा

साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक तसेच
प्रजासत्ताक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



-: शुभेच्छुक :-
इंजि.आशिष
लक्ष्मीकांत बारेवार
माजी नगराध्यक्ष गोरेगाव
सदस्य: गोंदिया जिल्हा नियोजन समिती



बेरार टाईम्स दशकपूर्ती सोहळा

साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक तसेच
प्रजासत्ताक दिनाच्या



हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छुक :-
मा.राजकुमार
बडोले
माजी सामाजिक न्यायमंत्री
व माजी पालकमंत्री
गोंदिया जिल्हा

BJP




साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



व अर्जुनी जिल्हा
परिषद क्षेत्रातील
सर्वांचे मन:पूर्वक
आभार

चर्तुभूज सेगोजी बिसेन
नवनिर्वाचित जि.प.सदस्य अर्जुनी





साप्ताहिक व न्युज
पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्तक
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

मा.विजयभाऊ शिवणकर
माजी अध्यक्ष
जिल्हा परिषद गोंदिया




साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



व सेजगाव जिल्हा
परिषद क्षेत्रातील
सर्वांचे मन:पूर्वक
आभार

पवन पटले
नवनिर्वाचित जि.प.सदस्य सेजगाव





साप्ताहिक व न्युज
पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्तक
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

राधेलाल पटले
उपाध्यक्ष:- गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँक
अध्यक्ष:- तिरोडा तालुका काँग्रेस कमेटी




# नगर परिषद गोंदिया

सिंगल युज प्लास्टिक वापर बंद करुन पर्यावरण वाचवूया








शिवकुमार शर्मा
उपाध्यक्ष


राजकुमार कुथे
सभापति
बांधकाम


सतिष देशमुख
सभापति
नगर रचना


सुनिल तिवारी
सभापति
शिक्षण


भागवत मेश्राम
सभापति
पाणी पुरवठा


मालती कापसे
सभापति
महिला व बालकल्याण


**श्री अशोक इंगळे**
अध्यक्ष, न.प.गोंदिया

**करण चौहान**, मुख्याधिकारी, नगर परिषद गोंदिया


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**फनेंद्रजी हरिणखेडे**
सेवा निवृत्त लेखा अधिकारी
गोरेगाव (कटंगी)


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**विजय ठोकणे**
जिल्हा समन्वयक
अपंग समावेशित शिक्षण सर्व शिक्षा अभियान गोंदिया


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**विजय बहेकार**
संस्थापक
ग्रामीण विकास शिक्षण संस्था गोंदिया


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**डॉ.वेदप्रकाश चौरागडे**
तालुका वैद्यकीय अधिकारी
गोंदिया


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**महेंद्रजी मोटघरे**
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, देवरी


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**रेखलालजी टेंभरे**
संचालक
गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँक, गोंदिया







साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

**झामसिंगजी टेंभरे**
गटविकास अधिकारी
पंचायत समिती, गोरेगाव



साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

**केशवराव मानकर**
अध्यक्ष भाजपा गोंदिया जिल्हा
माजी विधान परिषद सदस्य
कार्यवाह भवभूती शिक्षण संस्था व
सभापती कृ.उ.बा.स. आमगाव

साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा



**आमदार अभीजीतजी वंजारी**
नागपूर विभाग
पदवीधर मतदार संघ



साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

**मा.विलास निमजे**
गटविकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी-मोरगाव



साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक तसेच प्रजासत्तक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा

**शैलेषजी बैस**
संचालक
भंडारा-गोंदिया जि.प. कर्मचारी पतसंस्था

# गोंदिया जिल्ह्यातील प्रभावळ: एक लेखाजोखा

गोंड्या म्हणजे पळसाचे पान. पुढ गोंड्या या शब्दाचे अपभ्रंश होऊन गोंदिया झाला. ज्या मातीत, ज्या प्रदेशात पळसाचे पान असतील तिथले जीवनमान हे साधे व राहणीही साधी असेल. कारण या पानाचे अति सामान्य माणसाशी नाते जुळलेले आहे. गोंदिया हे शहर म्हणजे मोठे खेडे असलेले गाव. हे शहर मुंबई व कलकत्ता या लोहमार्गाचे केंद्रबिंदू. महाराष्ट्र व मध्यप्रदेश या संगमावरचे गाव! दोन बहिणी एकाच घरात दिल्या जाव्या व त्यांनी सुखाचा संसार करावा तसे इथले भाषिक स्वरुप आहे. मराठी आणि हिंदी या भाषा भगिनी सुखाने संसार करीत आहेत.


या जिल्ह्याला तसा वैभवशाली इतिहास आहे. पदमपुरात भवभुतीची साहित्य संपदा जन्माला आली. श्री चक्रधर स्वामींनी डाकराम सुकडी येथे महानुभाव पंथाची धर्मगाथा लिहिली. जवळच वाहणाऱ्या वैनगंगा नदीने इथले जीवन सुजलाम-सुफलाम केलेले आहे.

जवळच असलेल्या इटियाडोह, नवेगावबांधचे निसर्गरम्य स्थळ आणि नागझिऱ्याची वनश्री ही सामान्य माणसाला ही कवी बनवेल असे प्रेरणास्त्रोत आहेत. रोजच्या घटना माणसाला लेखक बनवू शकतात. आणि जीवनातील व्यंग माणसाला चित्रकार बनवू शकतात. गोंदिया ही व्यापार नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. राईस सिटी आहे. महाराष्ट्राच्या अतिपुर्वेकडील भाग म्हणजे गोंदिया ही तशी सांस्कृतीक नगरी नाही. तरी ही या शहरात साहित्याशी थेट संबंध असलेले साहित्यीक दिले ही गोष्टच रसिक मनाला उजाळा देणारी आहे.

आपल्या सर्जनशील आत्मशक्तीचा ज्यांना प्रत्यय आलेला असतो वा होऊ शकतो, भाषिक आणि भावनिक अविष्कार करण्याच्या दुर्दम्य इच्छेने प्रेरित झालेले असतात. समग्र जीवनाचे नवीन मूल्य निर्माण करण्याच्या क्रांतीकारी विचाराने जे झपाटलेले असतात आणि ज्यांना मानवाचा स्वतंत्र समाज निर्माण करण्याचा ध्यास लागलेला असतो तो माणूस कवीच असतो. हे कवी आहेत सुधाकर लोखंडे, कुसुमानंद, अनंत देशपांडे, “आकाशानंद“, वसंत मातुरकर, ऋतूराज हे गोंदियाच्या सांस्कृतिक इतिहासात कविता म्हणजे काय हे सांगणारे अधिकारी. कुसुमानंद “जनवाादचे “संपादक होते. आकाशानंद मुंबई दूरदर्शन वरुन निवृत्त झाले. तर ऋतूराज प्राचार्य म्हणून निवृत्त. कुसुमानंदाचा “सांजनभाचे दु:ख’ हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. या त्रयींनी जून मधल्या चिखल, दऱ्याच्या हॉलीडे कँप सारखा स्वत:ला एकाकी करुन घेतले होते.साहित्यदृष्ट्या वीस पंचेवीस वर्षे एकाकी करुन घेणे म्हणजे काव्याभिरूची यांचा आतून संबंध तोडणे असा आहे. राम शेवाळकर, मधू वाबगावकर, बाबा मोहोड,सुरेश भट, मधुकर केचे, उ.रा.गिरी, मनोहर चिंतामनी वझे, मनोहर सरपटवार, गणेश पाठक,अशा दीर्धिकेत असणारे हे कवी होत. कल्पकता बदलत्या अर्थच्छदांची भाषिक पुनरावृत्ती, गेयता इत्यादी प्रकारची बलस्थाने यांनी हा- ताळली. यांच्याच जोडीतील रमेश

लळगुणकार हे प्रसिद्ध कथालेखक. त्यांची कांदबरी प्रसिद्ध आहे. यांची वृत्तीक्षिणता एकांतप्रिय अर्जुनीच्या जंगलात या लोकांची गायीलेली गाणी चक्रीवादळाने उद्ध्वस्त केली.

सुक्ष्म कला सौंदर्यनिष्ठा आणि स्थूल सामाजिक बांधिलकी या घटकांचा परिणाम ज्यांच्या वाडमयीन व्यक्तीमत्वावर झालेला आहे ते सुप्रसिद्ध कवी, लेखक प्रा. कृष्णा



चौधरी, ऐन उमेदीच्या दिवसात ते इथल्या कॉलेजला कार्यरत होते. वि.सा. संघाची वास्त म्हणजे सरांचे कार्यस्थळ अनेक सांस्कृतीक घडामोडी या वास्तुने सरांच्या प्रत्यक्ष सहभागाने पहिल्या “झळई’ व “श्वेतकमळ’ असे त्यांचे काव्यसंग्रह. तर महात्मा फुले पूर्वसुरी आणि प्रभावळ असे राज्यशासन पुरस्कार प्राप्त पुस्तक प्रसिद्ध आहे.

संस्कृत भाषेत पुंडरीक म्हणजे पांढरे कमळ होय. बुद्धाचा धम्म हे सद्धम्म असून त्यावर पांढरा शुभ्र कमळाचे स्वरूप उलगडून सांगणारा ग्रंथ लोटस सुत्र होय. याचे मूळ संस्कृत नाव “श्वेतवमळ’ असे आहे. त्यांच्या पुढील ओळी याची साक्ष देतील.

““बाबा! तु अवतरला नसतास तर<br>
फुल्यांचे शब्द कुणी झेलले असते<br>
पोथीतील किडयांनी अजगर होऊन<br>
आम्हाला कधीचेच गिळले असते’’

“प्रिझ’ एक होता लाकुडतोड्या अशा कादंबऱ्या तर मोलकरीण येती घरा, असावे प्रेम शेजारी, यासारख्या दहा एकांकिका ज्यांच्या नावांवर प्रसिद्ध आहेत ते श्रीकांत गोडबोले. गुणवंत कामगार व्याख्यान हा त्यांचा आवडता विषय यानंतर पुढचे रसायन म्हणजे डब्ल्यू.कपूर मुक्तवाहिनी या सांस्कृतीक चळवळीतून पुढे आलेले जबरदस्त कवी “बंधमुक्त’ हा काव्यसंग्रह प्रकाशित. सर्वस्व व्यापणारी आणि आंबेडकरवादाच्या स्वप्नाकडे जाणारी अशी त्यांची कविता आहे. अनंत काळाच्या वेदना आजही खपल्या काढल्यागत सतावत असतात तयाच काळातील हे प्रथम श्रेणीतील कवी.

“जातीवंत तुझी वृत्ती<br>
हुंगत नसते नावात जात<br>
माझ्यासाठी तुझ्या झरी<br>
राखीव भांडी कोनाड्यात’’

व्यापक जीवनजाणीवा जपणारे कवी म्हणून माणिक गेडाम यांचे नाव अग्रेसर आहे. “काळीजकळ’ हा महत्वाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध समतेच्या मुखांनी जिंदगीचा राग आळवावा अशा क्रांतीच्या ज्वाळा फुलवणारा कवी.

“कुणी तरी नोंद केली<br>
मेली ती माणसे नव्हती<br>
रानटी पशूंची जमात होती<br>
अख्खी वस्तीच भस्मसात होते<br>
आणि नोंद मात्र पशू मेल्याची“

असे अस्वस्थ करणावे काव्यचित्रण युवराज गंगाराम या कवीणेही उभे केले आहे. उभ्या महाराष्ट्रात गाजलेला “डायरी’ हा काव्यसंग्रह आणि काही राहिलेल्या नोंदणी असे दोन कवितासंग्रह प्रस्तुत लेखकाच्या नावावर जमा आहेत. काय हवे व काय नको याचे भान ठेवणारा कवी. विद्रोहमुखी कविता अशी डोळस जाणीव पहाडाच्या ताकदीने माणूस उभा करण्याची हिंमत.

“परवा सुरेश देशपांडे<br>
रमेश रामटेकेला भेटला<br>
आणि असे वाटले<br>
एक देश दुसऱ्या देशाला भेटला’’

सुंदर जगण्याची सनद असलेला कवी प्रमोद अणेराव या कवीने निव्वळ परिवर्तनाच्याच कविता लिहिल्या नाहीत. तर कवितेला समजूनही घेतले. स्वतंत्र बाण्याचा कवी म्हणून ज्याची उद्या नोंद होईल असा हा आत्मभाव लाभलेला तडाखेबंद कवी.

“पावले बिनतक्रार चालली ज्या<br>
वाटेवर त्य स्वत:च<br>
सावली धरणाऱ्या झाडांचा कधीच<br>
नव्हता भरवसा<br>
आता हिशेब करुन आपल्या पथारी<br>
गुंडाळायला पाहिजे<br>
तुमच्या जिन्दाबादची तर कधीच<br>
चढली नव्हती नशा.

जीवनानुभूती, भावानुभूती, अस्सल कलाकृती अशी कृती ही बहुआयामी असते. हृदयाला स्पर्श करणारे काही संदर्भ जेव्हा कवी वापरतात तेव्हा ती जगण्याची परिभाषा झालेली असते. ही उर्जाच त्याला क्रांतीच्या वाटेकडे घेऊन जाणारी असते. या वाटेतील सहप्रव-ासी कविता दीक्षाभुमीच्या संपादन करणारे कवी बापू इलमकर, कवी रत्नाकर तिडके, कवी ज्योतिक ढाले यांच्या अशाच कविता अधिक सडेतोड, टोकदार व जीवनगामी आहेत. काव्यतिहासाने या प्रतिभांची नोंद घेऊनच जिल्ह्याच्या सांस्कृतीक वाडमयीन वारसा पुढे जाणार आहे. अशा विचारशील व संघर्षशील प्रेरणा गोंदिया जिल्ह्यात धगधगत राहोत व पुढच्या वाटचालीत उजेड होवोत असा हा प्रमाणबद्ध आलेख आहे.

**युवराज गंगाराम**
राजवाड, गणेशनगर, गोंदिया
भ्रमणसंवाद: ९४२३५१४३७१









# मामा तलावाचे पुर्नजीवन सिंचन क्रांती घडविणार

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हे तलावांचे जिल्हे म्हणून ओळखले जातात. त्यातही गोंदिया जिल्ह्याची ओळख राज्यात तलावांचा जिल्हा म्हणून आहे. ३५० वर्षापूर्वी सोळाव्या शतकात तत्कालीन गोंडराजा हिरशहा यांनी भविष्यातील पाण्याची आवश्यकता लक्षात घेता फर्मान काढले की, जो कोणी जंगले साफ करुन शेती करेल त्याला ती बहाल केली जाईल व जो कोणी तलाव बांधेल त्याला त्या तलावाखालील जितकी जमीन असेल ती खुद कास्तकार म्हणून बक्षीस दिली जाईल. या संधीचा उपयोग करुन घेत जिल्ह्यातील त्या काळच्या कोहळी व पोवार समाजातील मालगुजारांनी लोकसहभागातून तत्कालीन शाश्वत सिंचन व्यवस्थापनाची एक परंपरागत पध्दत आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी दूरदृष्टीकोनातून तलावांची निर्मीती केली. ब्रिटीश काळात हया तलावांची मालकी मालगुजारांकडे होती. सन १९५० मध्ये शासनाने हे तलाव मालगुजारांकडून ताब्यात घेतले. तेव्हापासून हे तलाव माजी मालगुजारी तलाव म्हणून ओळखले जातात.

तलावांचा जिल्हा म्हणून ओळख असलेला गोंदिया हा मागास, दुर्गम, आदिवासी बहुल व नक्षलदृष्ट्या संवेदनशील जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. जिल्ह्यात मुख्यत: धानाचे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. या पिकाला पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या धान शेतीला अनियमीत पडणाऱ्या पावसाचा फटका बसून धानाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेल्या माजी मालगुजारी तलावातून सिंचनाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने दूरदृष्टीकोनातून पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करुन त्यांना संजीवनी देण्याचा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे मुळ सिंचन क्षमता पुनर्स्थापन करण्याचे काम काही वर्षात टप्प्याटप्प्याने या कार्यक्रमाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील ४१८ मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाची कामे पूर्ण झाली. यामधून ६ लाख ६९ हजार ५८७.६७ घनमीटर गाळ या तलावातून काढण्यात आल्यामुळे तेवढीच पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. जिल्ह्यात १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे १७४८ मामा तलाव असून याची सिंचन क्षमता ३५,४५८ हेक्टर इतकी आहे. १०० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमतेचे ३८ मामा तलाव असून याची सिंचन क्षमता ६५१० हेक्टर इतकी आहे. मात्र या तलावातून प्रत्यक्षात अनुक्रमे १६,८२९ हेक्टर व ५८९० हेक्टर सिंचन होते.

माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष कार्यक्रमामुळे या तलावांची मुळ सिंचन क्षमता पुनर्स्थापन करण्यात येत आहे. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना सिंचनासाठी या तलावातील पाण्याचा उपयोग होण्यास सुरुवात झाली आहे. तलावांवर अवलंबून असलेल्या मत्स्य सहकारी संस्थांना देखील त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या कार्यक्रमाची मदत होत आहे.



तलावांच्या सर्वकष दुरुस्ती कामे हाती घेण्यात आली आहे. यामध्ये मामा तलावांच्या जलविमोचकाची दुरुस्ती, आवश्यक त्या ठिकाणी नवीन जलविमोचकाचे बांधकाम करण्यात येत आहे. सांडवा दुरुस्ती व आवश्यक त्या ठिकाणी नवीन सांडव्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. ज्या तलावाच्या कालव्याद्वारे सिंचन होते त्या कालव्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. तलावाच्या पाणलोट क्षेत्राची तपासणी करुन आवश्यक असल्यास तलावात पाणी येणारे मार्ग मोकळे करण्यात येत आहे. तलावांचे खोलीकरण करुन गाळ काढण्यात येत आहे. तलावात मत्स्य तळ्यांचे बांधकाम करण्यात येत आहे.

५० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमतेच्या तलावातील पाण्याचा उपयोग या पुनरुज्जीवनाच्या विशेष कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांनी करायला सुरुवात देखील केली आहे. केवळ एका पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादनात येणारी घट उपलब्ध पाण्यामुळे भरुन निघण्यास मदत झाली आहे. शेतकऱ्यांनी रबी हंगामात धान पिकाव्यतिरिक्त भाजीपाला, हरबरा, गहू ही पिके घेण्यास सुरुवात केली आहे.जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावांना गत जलवैभव प्राप्त करुन देण्यासाठी तलावांच्या पुनरुज्जीवन करण्याचा विशेष कार्यक्रम महत्वपूर्ण आहे. यामध्ये तलावातील पाण्याचा उपयोग करणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यात येत आहे. समुह तलावाचे सुरक्षीत व्यवस्थापन करीत आहे. पाणी वापर संस्थेच्या नियंत्रणाखाली शेतकऱ्यांना पाणी वाटप करण्यात येते. तलावाची बरीचशी कामे शेतकरी श्रमदान व लोकवर्गणीतून करीत आहे.

मागास, दुर्गम, आदिवासी बहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील असलेल्या गोंदिया जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक वाढीसाठी तलावांच्या पुनरुज्जीवनाचा विशेष कार्यक्रम मैलाचा दगड ठरणार आहे. तलावाच्या माध्यमातून शेतीला संरक्षीत सिंचनाची व्यवस्था निर्माण होत आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होण्यासोबत धान उत्पादक शेतकरी धानासोबतच इतर पिकांकडे वळत आहे. हा कार्यक्रम माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संजीवनी देणारा आहे.स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतामध्ये स्वखर्चाने गाळ वाहून नेण्यास तयार असणे ही प्राथमिक अत्यावश्यक स्वरुपाची अट आहे.गाळ उपसण्यासाठी आवश्यक असलेली यंत्र सामग्री व इंधनावरील खर्च शासनाकडून तसेच सीएसआरच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे जी.ओ. टॅगिंग, योजनेची संगणक प्रणालीवर माहिती संकलित करण्यात येईल. संनियंत्रण व मूल्यमापन या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाचे स्वतंत्रपणे त्रयस्थ यंत्रणेमार्फत मूल्यमापन करण्यात येणार आहे. गाळ साचलेल्या धरणालगत किंवा तलावालगत क्षेत्रातील शेतकरी अथवा अशासकीय संस्था गाळ स्वखर्चाने काढून त्यांच्या शेतात वाहून नेण्याची कार्यवाही करणार असल्याची सूचना संबंधित यंत्रणेला करतील. यासाठी इतर कुठलीही परवानगी लागणार नाही. गाळ उत्खनन करतेवेळी शेतकरी किंवा अशासकीय संस्थेकडून गाळाव्यतिरिक्त मुरुम किंवा वाळूचे उत्खनन होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. वाहून नेण्यात येणारा गाळ संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात वापरणे बंधनकारक असून अशा गौण खनिजाची विक्री किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना शेतकऱ्यांच्या हिताची असून शेतजमिनीला नवी संजीवनी देणारी आहे. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय यंत्रणेकडून धरण अथवा तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी केवळ तो गाळ स्वखर्चाने आपल्या शेतात टाकायचा आहे. यामुळे शेतजमिनीचा पोत सुधारुन उत्पन्न वाढीस हातभार लागणार आहे. रासायनिक खताच्या अतीवापरामुळे अनेक ठिकाणच्या शेतीचा पोत खराब झाला असून गाळमुक्त तलाव व गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून काढण्यात येणाऱ्या गाळामुळे शेतीचा स्तर सुधारण्यास निश्चितच मदत होणार आहे.



















बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
मा.मनोहरराव
चंद्रीकापुरे
आमदार
अर्जुनी-मोरगाव
विधानसभा क्षेत्र


बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
मा.सहषरामजी कोरेटे
आमदार,देवरी-आमगाव विधानसभा क्षेत्र
संदीप भाटिया
नवनिर्वाचित जि.प.सदस्य
अध्यक्ष- देवरी तालुका काँग्रेस


बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
गोपालदास अग्रवाल
माजी आमदार, गोंदिया वि.स.
प्रफुल अग्रवाल


बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
-: शुभेच्छुक :-
हार्दिक शुभेच्छा
विंध मुकेश शिवहरे
शिवसेना सहसंपर्क प्रमुख
गोंदिया जिल्हा
सदस्य
जिल्हा नियोजन समिती, गोंदिया


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
रवी ठकरानी
विदर्भ अध्यक्ष
नरेंद्र मोदी विचार मंच


साप्ताहिक व न्युज पोर्टल बेरार टाईम्स वर्धापन विशेषांक व प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
बेरारटाईम्स
१० वर्षे
दशकपूर्ती सोहळा
मनोज मानकर
गोंदिया



बेरार टाईम्स
१० वर्ष
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
मा. राजेंद्र जैन
माजी आमदार
तथा अध्यक्ष गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँक
सौ.वर्षाताई पटेल
अध्यक्ष, स्व.मनोहरभाई पटेल ॲकेडमी ,गोंदिया
मा.प्रफुल पटेल
खासदार राज्यसभा
माजी केंद्रीय मंत्री भारत सरकार




बेरार टाईम्स
१० वर्ष
दशकपूर्ती सोहळा
साप्ताहिक व न्युज पोर्टल
बेरार टाईम्स
वर्धापन विशेषांक
तसेच प्रजासत्ताक
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
मा.सुनीलभाऊ फुंडे
अध्यक्ष
भंडारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक
rawpixel